## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य

तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?

# प्रभुतरुण

(स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३)

www.prabhutarun.com

: संपादिका :
सुहासिनी कीर्तिकर

: कार्यकारी संपादकमंडळ :
मिनाक्षी जयकर
मयुरा नायक
संजना कोठारे
वैजयंती कीर्तिकर

किंमत १ रुपया

## प्रभु तरुण आश्रयदाते

१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे, कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर, कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक

वर्ष ८८ वे) प्रभुतरुण मुंबई, सोमवार, ता. १६ माहे जानेवारी, सन २०१२ (अंक ९८९


*संपादकीय*

# वसा

**-सुहासिनी कीर्तिकर**

एकविसाव्या शतकातील दुसऱ्या दशकातील पहिले वर्ष संपले. 'आज कलमें ढल गया!' पण विश्वाचे रहाटगाडगे थांबते थोडेच? आपण आपल्या सोयीसाठी काळाचे पाडलेले तुकडे तसे कायम अखंडच असतात. पळ, क्षण, घटिका, प्रहर, सकाळ, दुपार, संध्याकाळ, दिवस, रात्र, काल, आज, उद्या, गतवर्ष, भविष्यकाळ या सगळ्या कालमापनाला 'वर्तमान' आहे, ऐतिहासिक भूतकाळ आहे आणि आशादायक उज्ज्वल भविष्यकाळही आहे! काळाला आपण असे विभागले तरी अंती काळ अभंग, अखण्ड असाच आहे. सजीव असलेल्या मानव नावाच्या प्राण्याने आपल्या बुद्धीने त्याला 'काल' असे नाव दिले. मनाने त्याच्याशी नाते जोडत प्रसन्न सकाळ, भगभगीत दुपार, कातरवेळ आणि संध्याछाया असे प्रतिकरूपही दिले. या प्रतिकातूनच बालपण, तारुण्य, वृद्धावस्था (आता अतिवृद्धावस्था!) मोजली. कालगणना तयार करून 'कालनिर्णय' घेणारे आपणच महामानव! भूतकाळ जुना आणि वर्तमान ताजा ठेवणारे आपणच. म्हणूनच 'जुने जाऊ द्या मरणालागुनि, जाळुनि किंवा पुरुनि टाका, सावध ऐका पुढल्या हाका' म्हणत भविष्याकडे आपण कूच करत रहातो. याच भावनेतून जाणाऱ्या काळाला बाय् बाय् करत भवतालचे-मनातले-जनातले जळमट दूर करतो.

ही जळमटे दूर नाही केली तर? द्वेष, मत्सर, इर्ष्या, सूडभाव, दुसऱ्याचे वाईट चिंतणे, उणेदुणे काढणे, स्पर्धात्मक जगून इतरांचा पाडाव करण्याचा कट आखणे, त्यासाठी धडपडणे 'मागच्या पानावरून पुढे चालू'च रहाणार. कारण याच मानवी बुद्धीला भूतकाळ न विसरण्याचा आणि बौद्धिक कुरघोडी करण्याचा छंद (?) जपण्याचा नाद आहे. मग त्यापुढे अंतर्नाद कमी ठरतो. मानवप्राणी इतर प्राण्यांपेक्षा बुद्धीने वरचढ, श्रेष्ठच आहे. तसा तो मनोविकसनातही वरचढच आहे. सरल्या वर्षाला निरोप देताना, नवीन वर्षाचे स्वागत करताना या मनोविकसनाच्या बळावर माणसाने 'कालचे काल' म्हणत भूतकाळातील मारक घटनांना, कृतींना, विचारांना तिलांजली दिली पाहिजे. तरच निरोगी मनाने तो नवीन वर्षाचे स्वागत करू शकेल.

मित्रहो, याच निरोगी वृत्तीचा स्वीकार करत 'प्रभुतरुण' आजपर्यंत तुमच्यासह विकसित होत २०१२ मध्ये पाऊल ठेवत आहे. 'प्रभुतरुणा' विरुद्ध कोणी काही बोलले, कुणी काही लिहिले तरी प्रभुतरुणाने सुजाणपणे आणि विकसित मनाचे रूप म्हणून ते मनाला लावून घेतले नाही. सुहास कोठारेंनी हा पायंडा पाडला. विहंगनी या भावनेच्या, वृत्तीच्या रोपट्याचे सुंदर झाड तयार केले. त्याच झाडाच्या सावलीत मी बसल्याने द्वेष, मत्सर, कुत्सितपणा, टीका यांच्या झळा मला लागतच नाहीत. कारण ही सावली आणि त्या सावलीमागे असलेले 'प्रभुतरुण' हे विकसित नियतकालिक. पूर्णविकसनाकडे आणखी आणखी सरकणारे. या सरकण्यासाठी आता २०१२चे नवे कालदालन उघडले आहेच. नवीन

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

# Stepping into 2012

**-Vaijayanti Kirtikar**

2012 !! My mind has been in an overdrive mode constantly. The reason? Zoom to 12 midnight, 31st December 2011. Crazy partying with crazier friends, unrestrained volumes, joyous cries to welcome 2012, back slaps and tight hugs, all in the honour of stepping into glorious 2012. Another year to live your life, smile and donate smiles, love and spread love, forgive yourself and forgive others, some more time to fulfill your desires and another chance to get things right. All these thoughts whiz past my mind leaving me with a super wide smile which leaves no one in doubt as to how many teeth rest within my mouth. And then just as I raise the toast to 2012, the waves crash against the shore. 2012!! The Year!! The world to end!! And we are actually celebrating to welcome this year!! Why? Exactly at this juncture my mind begins its tumultuous journey into planning 2012.

As the first rays of the sun peep through, I pull out my diary and my pen. Everybody around me has crashed onto their beds by now. I am wide awake; excited and all set to famously live the last year of my life.

**My Diary: 1st January 2012**
**Things to do before December 2012**

January – Visit Europe
February – Trip to the South African Safari
March – View the Seven Wonders of the World
April – Relax on a cruise to a faraway land
May – Just read recently that you can now pay your way to a space shuttle and find yourself orbiting the earth. Not a bad idea.
June – Binge out at the best restaurants (*need to also make a list of restaurants)
July – Play the perfect couch potato. Eat, sleep and watch TV and be a perfect example of a couch potato.
August – Go surfing, bungee jumping, zorbing and try all the other adventure sports as well. After all Zindagi Na Milegi Dobara!!
September – Celebrate it as the month of giving. Give away all my worldly materials to the needy, maybe even a few of them can be a bit better off in the last few months with this gesture.
October – Watch all the movies from the 100 Greatest Movies list
November – Hug all my near and dear ones a warm good-bye and keep the hope alive with echoes of 'see you soon'.

I take a look at the list and I feel a sense of pride in me. Everything so well sorted out; I doubt I have left anything out. Alas, just as nothing lasts forever, so does my excitement. Niggling thoughts make their way in to my mind. What if the world does not end? Now that is a scary thought. I have probably spent every single dime by then and have also emotionally wasted myself saying good-byes to all. All this while the firm non believers must have been laughing at me. Am I willing to play the fool? Start my life without a penny in my pocket and no workplace either? Will I

(पान २ कॉलम २ वर)

(पान१ कॉलम २ वरून)

दोन लेखमाला आणि 'युवामंच'चे आश्वासक नवीन प्रयोगशील पान घेऊन या दालनात त्याने आता पाऊल टाकले आहे. इंग्रजीचा 'फ्लेवर' असलेले असेना हे 'युवामंच'चे पान. पण 'मराठी पाऊल पडते पुढे' हे वादातीत सत्य आहे.

हे सत्य मन आणि बुद्धीला उमगते म्हणूनच 'प्रभुतरुण' नवीन वर्षाला नव्या दमाने, नव्या उत्साहाने, नव्या श्वासाने, आनंदाने सामोरा जात आहे. मित्रहो, तुमच्यामुळे आणि तुमच्यासह. नेटाने आणि आपण करीत असलेल्या दर्जेदार वाङ्मयीन, सामाजिक कामावर विश्वास ठेवून. आपले काम नीटच करत रहायचे. तरच नववर्ष नवीन काही मिळवून देईल यावर ठाम श्रद्धा आहे माझी.

या काम नीट करण्यावरून एक पारंपारिक गोष्ट आठवली. (आठ-वण्यामुळे पुन्हा 'काल'ची गोष्ट 'आज'शी जोडली गेली!) एक श्रीमंत सावकार होता. त्याला छान छान वाडे बांधून घेण्याचा षौक होता. त्याच्या मर्जीतल्या एका वास्तुशिल्पकारा-कडून त्याने असे तीन, पाच, दहा...कितीतरी वाडे बांधून घेतले. मात्र त्या वास्तुतज्ञाला दहा वाडे बांधून झाले तरी मेहनताना काही दिला नाही. जो येई तो त्या नवनवीन वाड्यांचे कौतुक करी, वास्तुशिल्पीचे अभिनंदन करी. पण सावकाराची श्रीमंती भरभरून ओसंडून वाहत असतानासुद्धा या कलावंताला मानधन नाही! कलावंत फार नाराज झाला. पैसे मागमागून थकला. अशा परिस्थितीत सावकाराने त्याला आणखी एक नवीन वाड्याचे काम दिले. 'सगळ्यांनी तोंडात बोटे घातली पाहिजेत असं तुझं कसब दाखव बरं का.'- सावकाराने सांगितलं. 'शेटजी माझ्या आधीच्या कामाचे पैसे?'– कलावंताने आपली मागणी पुढे रेटली. सावकार म्हणाला, ''अरे हे आता शेवटचंच काम. मग तुला एकदमच छान, कधी तू कल्पनाही केली नसशील असा मेहनताना देईन मी.'' कलावंत या उत्तराने नाराजच झाला. 'म्हणजे काय? आत्तापर्यंत काही दिलं नाही. आता उगाच गाजर दाखवतोय झालं!'— असं त्याच्या मनात आलं. पण श्रीमंत सावकाराचा शब्द त्याला मोडवेना. म्हणून मग त्यानं काम सुरू केलं. पण गचाळपणे आणि बेशिस्तीने. अजिबात मन न घालता. तुळई तिरकी, जमीन ओबडधोबड. कमानी वरखाली, शोभेच्या जाळ्या कशातरीच. आतली दालनेही एक लहान, एक विसंगत मोठे अशी. वायुवीजनाला वाव नाही. मातीत भेसळ. वीटा कमकुवत. छताला कोठेही रमणीयता नाही. उंबरठे येणाऱ्याने ठेचकळावे असे. वाडा आपला उभा रहायचा म्हणून उभा राहिला. बेढब, वाकडातिकडा. कलावंत काम पुरे करून आला सावकारासमोर. 'शेटजी, वाडा पूर्ण झालाय. आता तरी मला सर्व कामांचा मोबदला द्या!' शेटजींनी सौम्य हास्य केले आणि कलावंताने अगदी नवीनच बांधलेल्या वाड्याच्या चाव्या त्याच्या हाती ठेवल्या. ''हा वाडा तुझा! आतापर्यंतच्या कामाचा आजवर कुणी दिला नसेल असा किंमती मोबदला.''

गोष्ट समजली मित्रांनो? आधीच्या काळात कितीही मनाविरुद्ध झाले तरी भविष्यातही काम नीटच करायचे असते. भूतकाळ, वर्तमानातील चांगल्या कामाचा मोबदला भविष्यात मिळतोच. उगाच भूतकाळातील नाराज करणारे संदर्भ मनात कशाला वागवायचे? उज्ज्वल भविष्यासाठी ते पुसून टाकणेच चांगले. २०११ सालाला निरोप देताना त्यातील चांगुलपण बरोबर घेऊन २०१२चे मनःपूर्वक स्वागत करूया. आपला 'प्रभुतरूण'-चा वसा नीट चालवूया. यासाठी मित्रांनो, तुम्हा सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा.

(पान१ कॉलम ४ वरून)

have truly lived my life with no unfulfilled desires in this one year? It is time for the bubble to burst.

I realize not too late that I am human and it is never possible to fulfill all desires, as we humans have a tendency to give birth to new desires with astonishing regularity. Again being a human, the optimist in me can never be in hibernation for too long. "World to end in 2012 – now never heard anything as ridiculous as this" screams the optimist within me. Hearing these screams, my other hyperactive personality 'Worry' sits up and takes notice of all that is happening. So the world is not ending in 2012? Oh, then I need to start saving for the future and plan my life, can't afford to splurge and live life on the edge. My wish list can wait. First on my list now is to buy that lovely house I have been checking out so often and I need to plan 2012 accordingly.

Oh no! What is happening? There goes the first page (and the first morning of 2012) into the dustbin. I silently congratulate myself for not having made any new year resolutions as they too would have been a similar waste of time and if written down would be resting in the dustbin with the 2012 wish list.

What a relief! Having proven to be a human to myself with this pre-dawn activity and with great hopes pinned onto 2012, I finally let myself close my eyes and happily dream away to a lovely 2012.

We hope that your new year is also abuzz with the rustle of optimism. Let the best wishes and resolutions illuminate your hearts once again. Let's together advance our journey once again with renewed vigour. Happy 2012 to all !!

## पाठारे प्रभू चॅरिटीज– विद्याभूषण सत्कार सोहळा

मी १ डिसेंबरला पुण्याला भाषण करायला होते. २ डिसेंबरला माधव जूलियनांवरील साहित्य संघातला कार्यक्रम पूर्णतया माझाच होता. ३ डिसेंबरला साहित्य संघातर्फेच पूर्ण दिवसाची दोन समीक्षा चर्चासत्रे रुईयाच्या सहकार्याने दिवसभर आयोजित होती. साहित्य संघाचेच महाविद्यालयीन मराठी साहित्य संमेलन ५ डिसेंबरला दिवसभर ठाण्याला होते. मी पूर्णपणे बुडून गेले होते या सर्वांत. उरता उरला ४ डिसेंबर. तेव्हढाच मोकळा. पण तरीही लोहचुंबकाने खेचून न्यावे तशी ४ तारखेला खारच्या जी. ए. कुलकर्णी सभागृहात गेले. लोहचुंबकत्व किती तरी प्रकारचे! आत्मीय आमंत्रण, दरवर्षीच होणारा दिमाखदार सोहळा आणि विजयी विद्याभूषण म्हणजेच आधुनिक ज्ञानेश्वरांची मांदियाळी! ४० ते ४५ ज्ञानेश्वरांचे सर्वसाक्षीने होणारे छाऽऽन कौतुक. भेटवस्तू, पुष्पगुच्छ, आणि कितीतरी हजारांची प्रत्येकाला बक्षिसे. या सर्व मुलांची मनोगते ऐकणे हा तर आनंदसोहळा. शिस्त वाखाणण्याजोगी. ४०-४५ मुले मंचावर इतकी सुशोभित दिसतात की पाठी सजवलेल्या दीपमाळा फिक्या ठराव्यात. बालगीत म्हणताना 'आभाळ' म्हटलं की आकाशाकडे हात, जमीन म्हटलं जमिनीकडे दोन्ही हात करीत अर्थ दृक् पद्धतीने दाखवला जातो. तसं 'हीऽऽ इतकी मुलं' म्हणताना अक्षरशः १८० अंशांचा कोन करीत हात स्टेजवर फिरवावा लागेल इतकी या ज्ञानेश्वरांची मांदियाळी... परत त्यांना सन्मानाने मंचावर घेऊन येणारी मिरवणूक. इतके सगळे चुकवायचे? चुकविणारा करंटाच! म्हणून गेले. दर वर्षी दिवाळी नित्यनूतन असते. तसाच हा सोहळाही दरवर्षीप्रमाणेच नित्यनूतन, आनंददायी होता. चॅरिटीजचे अध्यक्ष श्री. अजित विजयकर यांनी प्रास्ताविक केले. अप्रतिम भाषण. त्यात संस्थेचे कार्य होते, उगाच होणाऱ्या आरोपांविषयी खंत होती आणि त्या आरोपांचे तर्कशुद्ध खंडनही होते. समारंभाचे अध्यक्ष श्री. निलीम त्रिलोकेकर यांचेही भाषण खुसखुशीत आणि मार्गदर्शनपर होते. त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. हर्षा यांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण झाले. नेहमीप्रमाणेच नलिनी तळपदेंच्या शब्दांत असलेले स्वागतगीत नेहमीच्याच सुरेल आनंद देणाऱ्या गायकांनी गायले. शेवटी मात्र राष्ट्रभावना जागवणारी विविध गीते सादर झाली ती वेगळी. म्हणजे नेहमीच्या प्रथेप्रमाणे नव्हती. नेहमीच्या उत्साहात दात्यांनी देणग्या दिल्या–कितीतरी लाखांच्या घरात! नेहमीच्या सुविहीत पद्धतीने वीरपाल राणे यांचे भाषण, आभार प्रदर्शन पार पडले. येणाऱ्यांना समाधान, आनंद यांची मोठीच भेट देऊन ह्या 'निश्चयाचा महामेरू, बहुत जनांसि आधारू' असणाऱ्या चॅरिटीजने २०११ या वर्षावर आपली मोहोर उमटविली. ही मोहर उमटवून घेण्यासाठी २०१२ उत्सुकतेने पुढे सरकतेच आहे. या संस्थेचे अधिकारी तेच राहोत, न राहोत. त्यांची निष्ठा, कार्यतत्परता, शिस्त घेऊन हा 'महामेरू' अशीच आपली मुद्रा उमटवो!

## Fortune Teller

**-Ajit Mankar**

A new recruit joined our pharmaceutical company around 1970, when I had myself put in about 3 years service at the beginning of my career. His name was Naik, a Gujarati speaking young man then about 25 years of age. The staff soon discovered his inner qualities that he was an excellent fortune-teller, as a vast clientele started frequenting the office routinely. Since he was brought in by the Managing Director himself as a return of some favour, no one dared to object him from practicing his skills during the office hours. Besides care had also been taken not to assign any specific official duties to him considering his level of literacy. In short, he had been a blue eyed boy literally drawing pension. Another colleague of ours, Suresh Sawant soon became a close pal of Naik because of curiosity in getting his own future read and so did the rest of the staff. One morning there was a slight commotion as a couple of rich South Indian ladies entered the office crying loudly. It seemed they had lost some valuable diamond jewelry. Naik did his rituals and drew a plan of their residence on a piece of paper with minute details of location of every piece of furniture in a particular bed room. The ladies were stunned by the ability and detailed insight as seen in the sketching of their house by a stranger. Naik told them to open a particular cupboard and reach to the 7th yellow colour sari from the top and have a thorough search. The ladies rushed home and soon came back again overjoyed having found the misplaced articles at a place precisely zeroed in by Naik earlier and, of course, this time with a box full of sweets for distribution to all the staff. Another instance when we witnessed Naik's capabilities was when a fairly aged couple agonizingly came to him praying for help as their young grandson was missing in the crowd a few hours ago at Girgaon Chowpatty.

(Cont. on page 6 col.3)

# कालची मुंबई-आजची मुंबई

**— विश्वास नारायण अजिंक्य**

*(एखादी शेलाटी तरुणी नंतर वाढत वाढत जाऊन स्थूल-बेढब प्रौढा बनावी तशी मुंबई आज अजबगजब विस्तारलेली आहे. तरीही 'मुंबई नगरी बडी बांका, जशी रावणाची दुसरी लंका' हे तिचे रूप-स्वरूप कायम राहिलेले आहे. या रूपाचा माग घेणारे नवीन सदर या अंकापासून सुरू होत आहे.)*

**— संपादक**

मुंबईत सध्या सर्वत्र मॉलच मॉल दिसत असल्यामुळे मुंबई मालामॉल झाली आहे. पण हीच मुंबई इंग्रजांच्या पदरी पडेपर्यंत पराकाष्ठेची उपेक्षित होती. मुंबई बेटाची हजारो एकर जमीन दरदिवशी समुद्राच्या भरतीने पाण्यात बुडायची व ओहोटीच्या काळात ओली रहायची. पावसाळ्यात तर जिकडे तिकडे पाण्याचेच राज्य व्हायचे. पिकाच्या किंवा घरबांधणीच्या दृष्टीने तिचा काही उपयोग नव्हता. रोगराईला मात्र ही स्थिती क्रूर मदत करीत असे.

शेवटचा गुजराती सुलतान बहादूरशहाने १५३४मध्ये मुंबई व वसई ही ठिकाणे पोर्तुगिजांच्या हवाली केली खरी; परंतु पोर्तुगिजांनी १६६५ साली इंग्रजांना मुंबई बेटाचा ताबा देईपर्यंत १३० वर्षांच्या आमदानीत आपली प्रार्थनामंदिरे बांधणे आणि येथील जनतेला बाटवून ख्रिश्चन लोकांची संख्या वाढविणे याखेरीज दुसरे महत्त्वाचे काम काहीही केले नाही. इंग्रजांच्या कब्जात मुंबई आल्यावर पोर्तुगिजांचा जमाना संपून नवे युग सुरू झाले. इंग्लंडचा राजा व पोर्तुगालची राजकन्या यांच्या विवाहानिमित्त मुंबई आंदणादाखल मिळाली, पण उत्पन्नाच्या मानाने खर्चच जास्त. शेवटी १६६८ मध्ये मुंबई बेट वार्षिक अवघ्या दहा पौंड भाड्याने ईस्ट इंडिया कंपनीच्या पदरात पडले.

इंग्रजांच्या हाती मुंबई आली तेव्हा औरंगजेबाची बादशाही देशभर गाजत होती. तर शिवाजी महाराजांच्या वाढत्या वर्चस्वाचा अनुभव येऊ लागला होता. जेथे इंग्रजांची मुख्य वखार होती ते सुरत शहर महाराजांनी १६६४ व १६७०मध्ये यथेच्छ लुटले. सुरतेस इंग्रजांच्या व्यापाराचे बस्तान बसले तरी निर्वेधपणा नव्हता. उठल्या सुठल्या मुघलांचा किंवा इतरांचा उपद्रव होऊ नये म्हणून त्यांनी आपले प्रमुख ठाणे १६८७ मध्ये मुंबईस हलविले. त्यानंतरच या बेटाच्या विकासाला खऱ्या अर्थाने प्रारंभ झाला.

तत्पूर्वी मुंबईच्या गव्हर्नरने आंग्रे, सिद्धी, डच मुंबईवर केव्हाही हल्ला करतील ह्या भयापोटी मुंबईत किल्ला बांधण्याचे काम सुरू केले होते. १६६९ साली सुरू झालेले हे काम १७१६ साली म्हणजे ४७ वर्षांनंतर पुरे झाले. मुंबईचा हा किल्ला म्हणजे तटबंदी असलेले शहरच होते. किल्ल्यात इंग्रज आणि पारशी रहात असलेला भाग म्हणजे गोऱ्यांची मुंबई आणि किल्ल्याबाहेर रहाणाऱ्यांची वस्ती म्हणजे काळ्यांची मुंबई असे शहराचे विभाजन जनमानसात रूजले होते. तेव्हाचे चर्चगेट फ्लोरा फाऊंटनच्या आसपास सेंट थॉमस कॅथेड्रल जवळ होते. मुंबईतील गोऱ्या लोकांना असुरक्षित वाटू नये म्हणून त्याकाळी अपोलो गेट आणि चर्चगेट ही प्रवेशद्वारे सूर्यास्तानंतर बंद करण्यात येत असत. अर्ध्या तासाने बझारगेट बंद केले जाई. कोणत्याही परिस्थितीत सूर्यास्तानंतर कोणालाही प्रवेश मिळत नसे. सूर्यास्त आणि सूर्योदय यांच्या वेगवेगळ्या वेळा दर्शविण्यासाठी तोफा, ढोल आणि घंटा यांचे आवाज काढले जात.

आज बोरीबंदरला सेंट जॉर्ज हॉस्पिटल आहे त्या जागी फोर्ट सेंट हा किल्ला १७६९ साली बांधण्यात आला व किल्ल्याभोवती खंदक खणण्यात आला. १८५७च्या अयशस्वी उठावानंतर मुंबई बेटावरील इंग्रजांच्या राज्याला अंतर्गत तसेच बाह्य शक्तींकडून कोणताच धोका उरला नाही. त्यामुळे सेंट जॉर्ज व बॉम्बे फोर्ट हे दोन्ही किल्ले व तटबंदी पाडण्यास १८६० पासून सुरुवात झाली आणि खंदक सुद्धा बुजवण्यात आला. तीच आधुनिक मुंबईची सुरुवात.

मुंबई बेट ईस्ट इंडिया कंपनीला मिळाले खरे. पण ही प्राप्ती सुखाची नव्हती. समुद्राचे पाणी शहरभर पसरले होते. खाड्यांतील दलदल, घाण, दुर्गंधी यामुळे मच्छर, माशा, पिसवा वगैरेचा प्रादुर्भाव झाला होता. साथीचे रोग पसरत. त्यामुळे सुरुवातीला आलेल्या इंग्रजांची आयुमर्यादा इतकी घटली की माणसाचे आयुष्य दोन पावसाळ्यांचे अशी म्हण त्यांच्यात प्रचलित झाली. खाड्यांचा बंदोबस्त केल्याशिवाय मुंबईच्या समस्या सुटणार नाहीत याची तीव्र जाणीव तेव्हापासूनच झाली होती. मुंबईतील खाड्या भराव घालून बुजवल्या तरच शहरात वस्ती होईल असे कंपनीच्या मुंबईतील अधिकाऱ्यांना वाटत होते. त्यांनी त्यासाठी लंडन येथील कंपनीच्या वरिष्ठांकडे परवानगी मागितली तरी ती देण्यास कंपनीच्या संचालक मंडळाने अनेक वर्षे घेतली. शेवटी परवानगी मिळाल्यावर शहरभर पसरणारे समुद्राचे पाणी वरळीचा बांध घालून बंद केले गेले व सर्व मुंबईची रचनाच बदलून गेली.

इंग्रजांची मूळची संस्कृती व्यापाराची. व्यापाऱ्यांशिवाय व्यापार कुठला? इंग्रजांना या बेटावर येतील तेवढी माणसे हवीच होती. त्यांनी मुंबईत रहाणाऱ्यांच्या गरजांकडे लक्ष पुरवून त्यांच्यात मुंबईची ओढ निर्माण केली. गुजरात व कोकणपट्टीतील, पोर्तुगीज, सिद्धी यापैकी कुणाचेही राज्य सुरक्षित नसल्याचे अनुभवून लोक, व्यापारी मंडळी मुंबईची वाट धरत. इंग्रजही त्यांना उदारपणे आश्रय देत असत. १९व्या शतकाच्या सुरुवातीस प्रजेच्या सर्वांगीण विकासाची कामे इंग्रजांनी हाती घेतली. हे शतक इंग्रजांच्या भरभराटीचे असल्यामुळे मुंबई शहरात जे जे काही पहाण्यासारखे आहे ते सारे त्या शतकातले आहे. १८६१ ते १८६५ या अमेरिकन यादवी युद्धाच्या काळात येथील धनिकांनी अमाप धन मिळविले व ते मुंबई घडविण्यासाठी खर्च केले. युद्ध संपताच शेअर बाजार कोसळला. अनेक धनिक रसातळाला गेले. पण तेव्हाच्या गॉथिक शैलीतील इमारती अजून जशाच्या तशा आहेत. त्या काळची प्रेक्षणीय स्थळे म्हणजे टांकसाळ, गोदी, तोफखाना, सुताच्या व कापडाच्या गिरण्या, दारूखाना, पदार्थ संग्रहालय, तारायंत्र, रेल्वे, वेधशाळा, वैद्यशाळा.

एकेकाळच्या मोठा कुलाबा, धाकटा कुलाबा, मांजगाव, परळ, वरळी, माटुंगा, माहिम अशा सात बेटांच्या मुंबई महापालिकेची हद्द १९५०साली वाढविण्यात आली. सांताक्रूझ सकट बांद्रा, पार्ले, अंधेरी, जुहू, कुर्ला आणि घाटकोपर ह्या पाच नगरपालिका, चेंबुरची पंचायत, तसेच मुंबईच्या उपनगरातील आणि ठाण्याच्या जिल्हा बोर्डाच्या क्षेत्रातील ३४ गावे मुंबई महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट करण्यात येऊन तिचे नामांतर बृहन्मुंबई महानगर पालिका असे करण्यात आले; तर १९५७ साली तिचा विस्तार पश्चिमेकडे दहिसरपर्यंत आणि पूर्वेकडे मुलुंडपर्यंत केला गेला. मुंबई बेट इंग्रजांच्या ताब्यात आल्यापासून तेव्हाची मुंबई ३२५-३५० वर्षात हळुहळू बदलत गेली. आजच्या मुंबईचा बदलण्याचा वेग प्रचंड आहे. मुंबई महानगरात पोट भरण्यासाठी महाराष्ट्राच्या अन्य भागातून तसेच इतर राज्यांतून येणाऱ्या लोकांचे रूपांतर गेल्या ५०-६० वर्षात माणसांच्या लोंढ्यांमध्ये झाले आहे.

---


**पाठारे प्रभु चॅरिटीन वैद्यकीय चिकीत्सा शिबीर**

रविवार, दिनांक १२-२-२०१२
वेळ : सकाळी ९.३० ते १.३०
स्थळ : सुरेश विठ्ठल हॉल, ठाकुरद्वार, मुंबई

अनेक मान्यवर धन्वंतरींची मोफत सेवा व सल्ला ज्ञातीयांसाठी उपलब्ध केला जाणार आहे. आपला रक्तगट कोणता आहे व रक्तात साखरेचे प्रमाण किती याची तपासणी करण्यासाठी खास व्यवस्था केली आहे. कार्डियोग्राम मोफत काढला जाईल. हाडांमधील कॅलशियमची तपासणी (Osteoporosis Examination) सुद्धा केली जाईल.

कर्करोगाचे निदान करण्यासाठी खास तपासणी केली जाईल.

गरजूंनी अवश्य लाभ घ्यावा.

पाठारे प्रभु चॅरिटीज
विश्वस्त मंडळाकरिता
**अजित मो. विजयकर**
अध्यक्ष – विश्वस्त


**हसरी रेखा** -प्रदीप कोठारे



**YUVA MANCH**

**Together Towards Tomorrow**

**Prabhu Tarun Website :**

A request to all members who have registered for the Prabhu Tarun website to kindly provide their email IDs once again to us, so that we can provide you with your new user IDs.

## Desai'sively yours...

***Anuradha Simit Desai, crazy mum (as she likes to call herself) of two little girls, called the jet-setter at work and Masterchef at home, is going to fulfil her craving for literature by writing for us every alternate month. We bring to you her first musings in the series.***

Welcome you all, to a brand new year, and a brand new column. I wish you a brilliant and joyous 2012 and beyond, and hope to meet you here every two months.

The year has begun on quite a calm note for me, very unlike the year end. In December last I was the ping pong ball, but I really enjoyed it (after it was over). I visited Sweden in early December for official purposes, but that does not stop me enjoying the trip, right? It was nice and cold, but not nearly as cold as I feared it would be. And it only snowed after I returned. :-) The trip was successful professionally, and I also got the opportunity to sample a few of their Christmas delicacies, like mulled wine. Served warm, it is a red wine with all the Christmas spices, which are so suitable for the cold climate. Just delicious! The atmosphere was, well, merry, and Christmas decorations were being put out in all windows. The decorations were so elegant, no colourful bling mind you, just white candles, and white stars. And they would be adding to the decorations every week till Christmas. It was early for the Christmas trees, but they put up real Christmas trees in their houses even now! In our office there I witnessed the Lucia celebration, which is a typically Swedish Christmas celebration, where the woman brings the light. So a procession is led by a young woman or child wearing a crown of candles, followed by other children holding candles. It's a beautiful ceremony, and it also includes cookies at the end.:-) But no matter how fun an official trip is, it's not fun enough when it's keeping me away from my two angels.

I rushed back, looking forward to going on a vacation. We drove to Saputara, which is a little ahead of Nasik, accompanied by my mum and sis, doting company for the two brats. We enjoyed a very relaxed few days in the tranquil place, with cold weather, and rooms overlooking the lake. We were greeted every morning with a view of the sun rising from behind mountains and reflected in the lake below, it couldn't get any better. I enjoyed the gujju style vegetarian food but that was a problem for hubby and kids, who were saved by mum's karandi lonche! This place has a short cable car ride, between two mountains, and it is not very advanced, so the cars stop for a couple of minutes right in the centre of the rope way, all the more better to enjoy the panoramic view of the landscape, the cold breeze, setting sun, and the silence. Being the first cable car ride for my kids, they were both very excited and enjoyed it very much, wanting to repeat it every day. They also enjoyed the 'aquarium' which was nothing but a few fish tanks which were very well maintained with a variety of fish, and the museum which housed historical items from the region and depicted lifestyles of native people. There was also a honey bee centre, again nothing much, but quite informative about the process. All these 'attractions' kept the little ones occupied, and impressed us as to how this quiet place was being made into a tourist attraction.

At the end of the year, we, the wicked parents, left our kids behind to enjoy a wildlife holiday at Kanha Tiger Reserve. This is the national park which was the inspiration for Rudyard Kipling's 'The Jungle Book', and fittingly we stayed at the Mogli resort. J. Would we spot a tiger, was the big question, and to increase the chances we booked safaris into the jungle in the morning, afternoon and night! The safari is in open jeeps, and the morning safari starts at 6 am, for which we have to queue up at the park gates from 5 am, I cannot tell you how unbelievably cold it was. We were lucky to have a well informed driver, who was even keener than us for us to spot a tiger. In his single minded pursuit of this objective, he was driving like a maniac through the jungle intent on getting us to a spot where he believed there were higher chances of spotting a tiger in the early morning, before the other jeeps created a disturbance and drove the privacy loving animals deeper into the jungle. But it seemed that rather than growling tigers, growling tummies were our first concern. Against all advice from our driver we stopped for a bite at the canteen, and burnt our mouths trying to gulp hot samosas in record time. But woe, that was not enough; we had already missed the tiger crossing the track, as other people in jeeps crossing ours gleefully told us. I really think we were more disappointed for the driver, for whom it seemed to be a matter of pride that his customers should spot a tiger with him. But wait, a tiger had been spotted resting in a clearing between trees, and we were among the lucky few who got the opportunity to see this majestic creature from elephant back. It was a thrilling experience, more so because we were inside the jungle in Sher Khan's territory with no protection whatsoever. We also spotted almost all the other animals residing in this park including the great Bison (it is massive, and it eats only leaves, how does it grow that big?), the bara singa, spotted deer as numerous as stray dogs, sambar, and several birds like the spotted owlets, eagles, peacocks, and Indian rollers. Though the afternoon safari seemed like an anti climax after having already spotted the tiger, we were regaled with stories from the jungle and bits of information by a veteran driver and guide. They pointed out a couple of deer to us which were off the track, and were very still. They were looking down into the grass intently. The guide said there was probably a python there, and hence the deer were so alert. I asked why the deer didn't move away from the danger? "Kis taraf jaye jahaan khatra nahi hai?" said the wise guide. They were tracking the tiger, listening keenly to alarm calls from langurs and deer. Though we didn't spot the tiger at the end of it, the tracking itself was exciting. I was impressed continuously by the respect the people who lived off the jungle had for all types of life forms and the ecosystem itself. It was a marvellous way to end the year. The last day of the year also brought with it heavy rain and we enjoyed the night safari drenched and shivering. We had gone with a couple of likeminded friends and enjoyed every bit of the trip.

So it was an action packed December, fill in a few birthday parties, mine included, anniversaries, mine included, weddings, and sundry other social occasions and parties, and of course year end chaos at work, and you get the picture. That is why December is such a favourite with me. Can this year top the last? Hope and pray that it does. J

**बोल बेबी बोल**

ॲबस् (२ वर्षाची माझी मुलगी) :- ''बाबाई, (माझ्या सासूबाईना ती बाबाई म्हणते.) मला एक कंबर विकत आण.''

बाबाई :- ''कशाला? तुला आहे की!''

ॲबस् :- ''नाही. मला पाठ आहे. पोट आहे. हो; आणि पॅन्टमध्ये कुल्लू आहे. पण कंबर नाही आहे.'' माझ्या आईलाही फोन करून तिने आपली कंबरेची मागणी नोंदवली. कंबर देणारा आहे कुणी सप्लायर?

### नूतन हास्याभिनंदन

राम आणि श्याम दोन मित्र wills सिगरेट ओढत असतात. समोर एक सरदारजी येतो.

रामू : 'तू या सरदारजीला सिगरेट विकून दाखवशील?'

शामू : 'हो! त्यात काय?'

शामू सरदारजीकडे जातो. म्हणतो, 'ये wills का मतलब आप जानते हो?' 'नहीं।'

''wills मतलब वुमेन इन लण्डन लव्ह सरदारजी!'' लगेच सरदारजी सिगरेटचे पाकीट विकत घेतो. रामू पक्का. तो म्हणतो, 'त्यात काय मोठंसं? आता ते पाकीट परत मिळवून दाखव.' शामू त्याहूनही वस्ताद. तो सरदारजीला म्हणतो, ''अरे भाई। विल्स उल्टा पढो. सरदारजी लुक्स लाइक इण्डियन वुमन! है ना?''

सरदारजी चिडून पाकीट शामूकडे भिरकावतो.

# चिमणीच्या दातांनी

## पुन:प्रत्यय

*(नवीन वर्ष सुरू होताच दोन नव्या मालिका जन्म घेतात 'प्रभुतरुणा'त . प्रत्येकीचा पिंड वेगळा. विषय वेगळा. वाचकहो, कल्पना सुभाष कोठारेंनी लिहीलेल्या या नव्या ललितलेखांचा तुम्हीही 'चमणीच्या दातांनी' आस्वाद घ्या.)*

**— संपादक**

वाचता वाचता, माझा डोळा लागला असावा. बिनी मला हलवून हलवून जागे करीत होती. 'आत्या, हाफ् करून दे.' राजाज्ञा झाली. बिनीच्या हाती एक टॉफी होती. बिनीची मैत्रीण सखी, जवळच सुरी धरून उभी होती. सखीच्या हातची सुरी अलगद काढून घेत मी म्हणाले, 'लहान मुलांनी सुरीला हात लावायचा नसतो हं! अन् टॉफी सुरीने नसते तोडायची, चिमणीच्या दातांनी तोडायची असते ती!' 'चिमणीच्या दातांनी म्हंजे?' 'म्हंजे असं एखादं कापड घ्यायचं अन् मग दातांनी तुकडा करायचा!' टॉफी ओढणीत ठेवून मी दोन तुकडे करून दोघींच्या हाती दिले. खूष होत दोघी पळाल्याही! नशीब माझं! 'चिमणीला दात कुठे असतात पण?' हा प्रश्न विचारला गेला नाही.

मीही मग या चिमण्यांसारखीच भुर्रकन् उडाले अन् भूतकाळात पोचले. चौथीपर्यंत मुलामुलींची एकच शाळा असे. पाचवीपासून नव्या इंग्रजी शाळेत मोठा भाऊ जाऊ लागला होता. त्या रस्त्यावर कुठेतरी चिंचेचे झाड असावे. हाफ् पॅन्टच्या खिशात भरून तो कधीकधी चिंचा घेऊन येत असे. त्या चिंचांना धुळीचा एक प्रकारचा वास असे. तरीही आम्ही लहान बहिणी त्या आंबट, तुरट मेव्याची आतुरतेने वाट बघत असू. खोकला होऊ नये म्हणून छोटीच्या वाटणीस एखादेच चिंचेचे बुटुक् येई. परकरात गुंडाळून 'चिमणीच्या दातांनी' तोडलेला तो तुकडा ताईकडून घेऊन चघळतांना छोटीला मजाच वाटे. थोडी मोठी झाल्यावर, हाच प्रयोग छोटी इतर खाऊ खातांनाही करू लागली. दुपारच्या सुट्टीत मोठ्यांच्या तळहाताएवढा, गोल चपटा, पितळी डबा उघडला जाई. उंबराच्या झाडाच्या सावलीत अंगतपंगत चाले. आईच्या शिंगड्याच्या मोठ्या डब्याचे, आतून कल्हई केलेले ते बालरुपडे– तो खाऊचा डबा, काय मस्त, मस्त पदार्थ घेऊन येई! खोबऱ्याची वडी, चण्याची बोरे, टॉमेटोचा मुरांबा लावलेली चपातीची गुंडाळी, खाऊ कुठलाही असला; तरी फ्रॉकमध्ये ठेवून त्याचा तुकडा पाडून, मैत्रिणीच्या हाती ठेवण्यात परमानंद दाटलेला असे. एकमेकांचे उष्टे खाऊ नये– हा धडा लहापणीच मनावर बिंबविला गेला होता. यावर तोडगा म्हणजेच, चिमणीच्या दातांनी तोडून दुसऱ्यांना देणे! दुसऱ्याबरोबर वाटून खावे, हा दुसरा संस्कारही बालपणीच झालेला!

हल्लीची बच्चेमंडळी नाही का 'रिटर्न गिफ्ट' स्वत:च्या बर्थडेला देऊन हाच संस्कार पाळत? बर्थडे केकचा तुकडा मात्र, चिमणीच्या दातांनी तोडणे अशक्यच! म्हणूनच की काय, तो उष्टावलेलाच एकमेकांना खिलविल्या जातो. 'शेअर' करणे महत्त्वाचे!

परत छोटी बनून बालपण तुमच्याशी 'शेअर' करीत असतांना, सध्या टी.व्ही.वरील जाहिरातीतील एक छोटी नजरेसमोर तरळून गेली. आपल्या हातातील चॉकोलेट-बार संपूर्ण खायला मिळावा म्हणून ती पटकन् उष्टा करून म्हणते 'ये तो झूटा है।' तिची आजी थट्टेत म्हणते, 'पण मला तर चालेल तुझं उष्टं!' मुलीचा चेहरा पडतो. तिची ममी अखेर सर्वांनाच 'स्वीट डिश्' म्हणून चॉकलेट आणते. 'आपल्या हातातील बार आता पूर्ण आपलाच!' या कल्पनेने मुलीचा चेहरा उजळून उठतो. अरेच्चा! म्हणजे जाहिराती-तील या मुलीवर 'उष्टं खाऊ नये' हा संस्कार झालेला आहे. पण 'खाणं 'शेअर' करावं' हे कां बरे शिकवले गेलेले नाही?

जाऊ द्या झालं! इडियट बॉक्सवरील जाहिरातीचा इतका कशाला विचार करायचा नं आपण? हल्ली 'शेअर' शब्द उच्चारला की लगेच 'घोटाळा' शब्दच आठवतो नं? शब्दकोशातील 'शेअर'चा अर्थ मात्र वाटा, भाग, असाच आहे. याच 'शेअर', 'शेअरिंग'ला चिमणीच्या दातांनी मोडलेला तुकडा – हा प्रतिशब्द कसा गोऽऽड वाटतो किनई?

असे गोऽड तुकडे, आठवणी, प्रसंग, व्यक्ती, दृश्ये, गाणी, पुस्तके वगैरे, वगैरे मी तुमच्याबरोबर 'शेअर' करणार आहे. म्हणून या सदराचं हे गोडुलं नाव ठेवलंय, 'चिमणीच्या दातांनी!' दरमहा हे सदर वाचायला तुम्हाला नक्की आवडेल. आमच्या बिनीच्या भाषेत अगदी 'गॉडप्रॉमिस्!'

मघाशी चिंचेचे बुटुक चोखवणारी छोटी समोर असतांना, तुमच्यापैकी कुणाला चिमणीच्या दातांनी मिळालेली पेरूची फोड आठवली असेल, तर कुणाला कैरी! खाऊ कुठलाही असला तरी रम्य बालपणातील पुन:प्रत्ययाचा आनंद तुमचा व माझा सारखाच असणार. कुणाकुणाबरोबर, कितीकिती, कायकाय 'शेअर' केलेलं आठवून सांगावसंही वाटत असेल नं? कसली वाट बघताय मग? अहो, उचला की फोन आणि फिरवा माझा नंबर! त्यासाठीच दिलायं हं तो इथे शेवटी! मला मात्र आता थांबायलाच हवं. संपादकीणबाईंनी एक तारखेची डेड्लाईन दिलीयं नं! नूतन वर्षाच्या तुम्हा सर्वांना भरपूर शुभेच्छा हं! अच्छा! पुढील अंकी भेटूच!

**— कल्पना सुभाष कोठारे**

(दूरध्वनी: २६१०४५५२)

## पाठारे प्रभुनगर चौक

दिनांक ११-१२-११ रोजी पाठारे प्रभु सहकारी गृहनिर्माण संस्थेतर्फे खार येथील त्यांच्या सांस्कृतिक केंद्रामध्ये अभिमानास्पद सोहळा साजरा झाला. माजी गृहमंत्री असलेल्या माननीय श्री. गजानन कीर्तिकर यांच्या हस्ते फटाक्यांच्या लडीत 'पाठारे प्रभुनगर चौक' फलकाचे अनावरण झाले. या हृद्य सोहळ्याला स्थापत्य समिती, उपनगरे यांचे अध्यक्ष श्री. मोहन लोकेगावकर, भाजपाच्या विधानसभेवरील वांद्रे (प.)च्या अध्यक्षा सौ. अलका केरकर आणि 'प्रभुप्रभात'च्या संपादिका श्रीम. वंदना प्रमोद नवलकर यांची प्रमुख उपस्थिती होती. 'पाठारे प्रभु नगर चौक' असे नामकरण करण्यासाठी ज्यांची मदत झाली ते नगरसेवक अॅड्. आशीष शेलार यांचा प्रभुपगडी घालून आणि आरती करून सत्कार करण्यात आला. सत्काराला शेलार यांनी 'टोपी' न घालता गजानन कीर्तिकरांनी मानाची 'पगडी' घातली असे नर्म विनोदी उत्तर देऊन पाठारे प्रभूंना शुभेच्छा दिल्या. संस्थेचे अध्यक्ष असलेले श्री. श्रीपाद नारायण धैर्यवान संस्थेत विविध पदांवर गेली पन्नास वर्षे कार्यरत आहेत. त्याबद्दल अत्यंत समर्पक ठरेल असा त्यांचाही पगडी, शाल, श्रीफळ देऊन गजानन कीर्तिकरांहस्ते सत्कार केला गेला. या सोहळ्यात वंदना नवलकर, सौ. केरकर, लोकेगावकर यांची शुभेच्छापर भाषणे झाली. श्री. अशोक तळपदे संस्थेचे कार्यवाह म्हणून मंचावर होते आदींचे समयोचित प्रास्ताविक केले. क्षमा कोठारे, योगिता नवलकर आणि यांचे सुश्राव्य गायन, श्री.उल्हास राणे यांची तबल्यावर साथ यामुळे स्वागतगीत आणि पसायदान यांची सुशोभित चौकट कार्यक्रमाला लाभली. चॅरिटीजचे अध्यक्ष श्री. अजित विजयकर आणि 'प्रभुतरुण'च्या संपादक प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांचाही या सोहळ्यात यथोचित सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन स्वाती राणे यांचे होते. मुंबईकर असलेल्या पाठारे प्रभु ज्ञातीच्या नावाची अधिकृत नोंद होण्यासाठी अशी नामकरणे मोलाचे कार्य करत असतात. हे कार्य केल्याबद्दल श्री. अशोक तळपदे, त्यांचे इतर सहकारी आणि त्यांची संस्था यांचे अभिनंदन.

## पाठारे प्रभू सोशल समाज

२१ नोव्हेंबर २०११ रोजी समाजाचे दीपावली संमेलन मोठ्या उत्साहात साजरे झाले. आबालवृद्धांचा यात लक्षणीय सहभाग होता. प्रमुख पाहुणे होते डॉ. महेश शरच्चंद्र अजिंक्य. अनेक देणगीदारांनी या कार्यक्रमाला उत्स्फूर्त हातभार लावला. समाजाध्यक्षा सौ. प्रमिला तळपदे यांनी अशा दात्यांचा नेहमीच प्रतिसाद लाभावा अशी सार्थ अपेक्षा व्यक्त केली आहे. सोशल समाजाच्या या देखण्या कार्यक्रमाविषयी वेगळे न लिहीता एक बोलकी प्रतिक्रियाच देत आहे.

### प्रतिक्रिया

सौ. प्रमिला तळपदे यांस,

आपल्या सोशल समातेचं कार्य आपल्या अध्यक्षतेखाली उत्तम चालले आहे हे मी प्रथमत: नमूद करते. थोड्याच दिवसांपूर्वी २१ नोव्हेंबरला भरलेल्या समाजाच्या दीपावली सम्मेलनात सहभागी होण्याचा योग आला व त्यावेळी झालेल्या सोहळ्याने मी खरोखरीच प्रभावित झाले हे आपणास कळविण्याकरता या पत्राचा उपक्रम!

मुख्यत: कु. आशिका पुष्पल विजयकर हिचे गणेशवंदनाचे नृत्य व त्यानंतर आपल्या महिलांचे दीप नृत्य फार हृद्य होते. त्यानंतरच्या मनोरंजक नाटकामध्ये वेचून योजलेली सर्व नृत्ये (विशेषत: आपल्या चिमुरड्यांचे नृत्य). अतिशय बहारदार झाली. या सर्व नृत्यातील तरुणतरुणींचा उत्साह अवर्णनीय होता.

नाटकातील सिद्धार्थ धैर्यवान याची कृष्णाची भूमिका फारच सुंदर वठली होती. त्याचप्रमाणे नानानानी वगैरे इतर सर्वच भूमिका उत्तम वठल्या. त्यातल्यात्यात, मला भावलेली पात्रे म्हणजे आल्हाद गोरक्षकरांचा नाना, व सौ. भारती विजयकरांची नानी फारच उत्कृष्ट होती.

दरवर्षी असेच कार्यक्रम आयोजित कराल अशी अपेक्षा.

आपली,

माधुरी विहंग नायक

❁ पाठारे प्रभू सोशल समाजाचा वर्धापन दिन २३ मार्च रोजी गुढीपाडव्याला साजरा होणार आहे. समाजाच्या सर्व उपक्रमांना मन:पूर्वक शुभेच्छा.

*

## अभिनंदन

❁ कु. अनुष्का आशीष नवलकर हिला रामकृष्ण मठ, खार येथे स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त आयोजित इंग्रजी वक्तृत्वस्पर्धेत तृतीय पुरस्कार प्राप्त झाला. अभिनंदन.

❁ डॉ. सुमन नवलकर यांना 'साहित्य दरवळ मंच' तर्फे पुरस्कार घोषित झाला. अभिनंदन.

## प्रभुतरुणास देणगी

❁ विलोभना, मृदुला आणि उज्ज्वला या कन्यांकडून त्यांचे वडील कै. गोविंदराव भगवंतराव आगासकर यांच्या प्रथम पुण्यतिथी-निमित्त (३१-१२-१०) रू. १००१/-

❁ विलोभना, मृदुला आणि उज्ज्वला या कन्यांकडून त्यांच्या आई सौ. कामिनी गोविंदराव आगासकर (मृत्यू : १८-१२-९९) यांच्या स्मरणार्थ रू. १००१/-

❁ श्रीम. कस्तुर रवींद्र तळपदे याजकडून रु. १००१/-

❁ सौ. प्रतिभा आणि श्री. सुभाषचंद्र विश्वासराव कीर्तिकर यांजकडून त्यांचे पुत्र श्री. स्वप्नील यांच्या विवाहाप्रीत्यर्थ रू. २५१/-

❁ श्री. उल्हास वामनराव कोठारे यांजकडून पत्नी सौ. स्निग्धा कोठारे यांच्या साठाव्या वाढदिवसाप्रीत्यर्थ रू. १६१/-

❁ सौ.जना रवींद्र नवलकर यांजकडून प्रभुतरुणास भाऊबीज रू. १०१/-

❁ सौ. स्मिता अमोल रणजीत यांजकडून प्रभुतरुणास भाऊबीज रू. १०१/-

❁ श्रीम. सुनीती विठ्ठल कोठारे यांजकडून प्रभुतरुणास भाऊबीज रू. १००/-

## पाठारे प्रभु महिला समाज

रविवार दिनांक २९ जानेवारी २०१२ रोजी पाठारे प्रभु महिला समाजातर्फे वार्षिक 'आनंद मेळावा' पाठारे प्रभु को. ऑप. सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्राच्या सभागृहात, १२वा रस्ता, खार येथे आयोजित करण्यात आला आहे. वेळ सकाळी १० ते रात्रौ ९. स्टॉल घेऊ इच्छिणाऱ्यांनी रू. ३०० भरून स्टॉल बुक करावा. उद्‌घाटन सौ. नीला विनय त्रिलोकेकर ह्यांच्या हस्ते होईल.

पाठारे प्रभु महिला समाजाचा ९७वा वार्षिक बक्षिस समारंभ रविवार दिनांक. २६ फेब्रुवारी २०१२ रोजी पाठारे प्रभु को. ऑप. सोसायटी प्रभु नगर खार येथील सांस्कृतिक केंद्राच्या सभागृहात सुप्रसिद्ध अभिनेत्री डॉ. सौ. निशिगंधा वाड यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी ४ वाजता साजरा करण्यात येईल.

शनिवार दिनांक ११ फेब्रुवारी २०१२ रोजी पाठारे प्रभु महिला समाजाने 'घडा पार्टीचे' आयोजन दुपारी ४ वाजता प्रभु सेमिनरी शाळेचे सभागृह, भाई जीवनजी लेन, ठाकुरदार येथे केले आहे. शुल्क १०० आहे. तरी सर्व सभासद भगिनीनी उपस्थित रहावे, असे आवाहन महिला समाजाच्या अध्यक्षांनी केले आहे.

## अभिनंदन

कु. वैजयंती विश्वास अजिक्य ही ''नॅशनल रायफल असोसिएशन ऑफ इंडिया'' ने आयोजित केलेल्या व १४ ते २२ नोव्हेंबर २०११ या कालावधीत ''शिवछत्रपती क्रीडा संकुल'', बालेवाडी, पुणे येथे झालेल्या ''५५व्या राष्ट्रीय शुटींग अजिंक्यपद स्पर्धेत'' १० मीटर पिस्तूल शुटींगच्या युवा महिला गटात सहभागी झाली होती. या स्पर्धेत तिने ४०० पैकी ३४४ गुण मिळविले.

तसेच क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या द्वारे आयोजित ''आंतर शालेय शुटींग'' स्पर्धेत १० मीटर पिस्तूल शुटींगच्या १९ वर्षाखालील मुलींच्या गटात मुंबई शहर विभागात रौप्य पदक, त्या पाठोपाठ मुंबई झोनमध्ये रौप्य पदक व नंतर राज्यस्तरीय स्पर्धेत ''कांस्य पदक'' मिळविले. त्यामुळे तिची १ ते ४ डिसेंबर २०११ या कालावधीत बालेवाडीत झालेल्या राष्ट्रीय स्पर्धापूर्व प्रशिक्षण शिबीरासाठी निवड होऊन ती ''स्कूल गेम्स फेडरेशन ऑफ इंडिया''ने आयोजित केलेल्या व ५ ते ८ डिसेंबर २०११ या कालावधीत बालेवाडी, पुणे येथेच झालेल्या ''५७व्या राष्ट्रीय शालेय शुटींग'' स्पर्धेत सहभागी होऊन तिने महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधीत्व केले. या स्पर्धेत तिने ४०० पैकी ३५२ गुण मिळवून महाराष्ट्राच्या संघाला ''रौप्य पदक'' मिळवून देण्यात मोलाची कामगिरी बजावली.

या वर्षीचे आमचे सदर लेखक श्री. विश्वास अजिक्य यांच्या कन्येने कौतुकास्पद कामगिरी केली आहे. अभिनंदन. असे आणखी यश 'शूट' करीत रहा!


॥ श्री इंद्रायणीप्रसन्न ॥ ॥ श्री गुरुदेव दत्त ॥

**प्रकास्व कॅटरर्स**

*शुभ मंगल, स्वागत समारंभ...... सहली, सम्मेलन!*

*आम्ही, अशा मंगल प्रसंगी रुचकर जेवणाची व्यवस्था करण्यास सज्ज आहोत. पाठारे प्रभूंच्या वैशिष्ट्यपूर्ण पदार्थांची व्यवस्था, शाकाहारी/मांसाहारी जेवणाचे चवदार गरमागरम खाद्य पदार्थ नियोजित वेळी पोहचविण्याची, वितरण आदी सेवा! विशेषत: सागुपुरी, गोडी बटाटी, अननस सांबारे इ. आणि तसेच पंजाबी डिशेस, गुजराथी डिशेस शिवाय सजावट - रोषणाई फर्निचर आदी व्यवस्था देखील करतो. खारमधील गायत्री मंदिराशेजारील पाठारे प्रभू ज्ञाती सभागृहात एकमेव आम्हालाच मागणी असते.*

संपर्क :

**प्रवीण धुरंधर**

डि. १३, बँक ऑफ इंडिया, वृंदावन सोसायटी, दुसरी कोल डोंगरी लेन, स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी (पू.) मुंबई-४०० ०६९.

फोन : २६८४ ०९ २६ भ्रमणध्वनी : ९९६९१०४३८८


**बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुणाच्या मालकीचे हे पत्र** स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ शाह अँड नाहर इंड. इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४०० १०२ येथून प्रसिद्ध केले. **कार्यालय दूरध्वनी** : ६७८ ०० ४४

## प्रभुतरुणाची डायरी

### बाळा जोजो रे

| | | | |
|---|---|---|---|
| १५-१२-११ | सौ. शीतल आणि प्रसाद कोठारे, | पुत्र, | मालाड. |
| १७-१२-११ | सौ. मयुरा आणि गुंजारव विहंग नायक, | पुत्र, | मालाड. |

### नारळसाखर दिला

१७-१२-११ श्री. अन्वय रंजन देसाई कु. निवेदिता नीलेश विठोबा नायक

### नांदा सौख्यभरे

१६-१२-१२ श्री. स्वप्नील सुभाषचंद्र कीर्तिकर, कु. करिष्मा मयुर अजिक्य

१६-१२-११ श्री. तेजस प्रदीप राणे, कु. केतकी समेळ (आंतर्ज्ञातीय)

१८-१२-१२ श्री. आदिनाथ महेश कोठारे, कु. उर्मिला कानिटकर (आंतर्ज्ञातीय)

२३-११-१२ श्री. निमिष नरेन्द्र धुरंधर, कु. किर्ती महेंद्र जाधव (आंतर्ज्ञातीय)

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| १२-१२-११ | श्री. अशोक माधव राणे, | वय ६७, | खार |
| १०-१२-११ | श्री. साईहास साईप्रसाद प्रधान, | वय ५०, | सायन |
| १६-१२-११ | श्रीम. लता मुकुंद विजयकर, | | पुणे |
| ६-१२-११ | श्रीम. विनता चंद्रकांत तळपदे, | वय ८५, | लोणावळा |
| ७-१२-११ | सौ. सरल मदनसेन सेंजित | वय ८३, | मालाड |

(Cont. from page 2 col 4)

A police complaint was formally lodged and the search had already begun, but with no luck. Therefore, their own anxiety guided by someone who knew Naik led them to our office during the lunch time. Without wasting time, Naik attended to them. He advised them to take a taxi immediately and rush straight-away to Marine Drive sea side footpath opposite Talk of the Town junction. No need to say, the old grand parents spotted, at the designated junction, their 4 year old grand son crying and totally frightened and exhausted. What a relief and what a moment that must have been for the oldies ! In spite of all this happening around me, somehow I disliked this man Naik. May be that he had no work and all pay, that might have perturbed me! Anyway, I was not comfortable with his presence and deliberately avoided to talk to him or go anywhere close to him. Or may be, it is because of my snobbish nature that I kept myself aloof from him, although by this time, the rest of the staff was all friends with him. Somehow, Naik had already noticed my peculiar distancing behaviour towards him. He was never required to leave his seat from morning till the close of office hours as mostly he was busy surrounded in consultations with someone or the other the whole day. One afternoon, just as I finished my lunch and came back to my desk to read the news magazine as per my daily routine, to my surprise and a little discomfiture, Naik uninvited pulled up a chair and sat in front of me.

Before I could open my mouth for reaction, he himself started the conversation by asking the reason of my avoiding him. I reacted by saying that I am least interested to know of my future like others, and that I regard privacy of myself and my family as a supreme objective at all costs. However, my comments made no difference to Naik as he appeared to be determined to

unfold my future whether I like it or not. He held a cigarette in his hand, lit it up and puffed it twice disdainfully in my face. All of a sudden his eyes grew bloody red, face changed completely, wearing a look of a ferocious animal-like old man full of wrinkles and nearly shouted at me in a shrill frightening voice certainly not of his own, asking me to keep quiet! I at once shivered and felt there was something eerie and dreadful happening around me. That unpleasant moment I suspected Naik was not his own self but some kind of bizarre supernatural power had taken possession over him. I was so much nervous with this thought that I promptly decided to wind up my wise-cracks and not to agitate Naik in any way!

(cont. in next issue)

## सांत्वन

'प्रभुतरुण'च्या कोषाध्यक्ष डॉ. सुरेखा बन्सी धुरंधर यांच्या वडिलांना (श्री. दुर्वे यांना) दिनांक २-१-१२ रोजी देवाज्ञा झाली. डॉ. सुरेखा आणि त्यांचे कुटुंबीय यांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत.